पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन,
12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/ वायरमन, 12 वी पास फ्रेश/ अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

व्यवसाय
आपण ज्येष्ठ, सेवानिवृत्त, गृहिणी आहात का ?
आपला वेळ, शिक्षण यांचा उपयोग करून नामाकित कंपनीत आपल्याला वेळेत कामाची सुवर्णसंधी!
निश्चित उत्पन्न ■ कोणतीही गुंतवणूक नाही
संपर्क : 8087459854

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २७३ वा | बुधवार, दि. १० जून २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# गोरे यांची रणनीती, मोहिते-पाटलांचा डाव 'अदृश्य हातां'मुळे विधानपरिषदेत रंगली प्रतिष्ठेची लढत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीने आता केवळ उमेदवारांमधील संघषार्चे स्वरूप न राहता ती राज्यातील दोन प्रभावी राजकीय केंद्रांमधील प्रतिष्ठेची लढत बनली आहे. एकीकडे महायुतीचे उमेदवार राजेंद्र राऊत यांच्या विजयासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आखलेली रणनीती असून, दुसरीकडे मोहिते-पाटील गटाने वसंतराव देशमुख यांच्या उमेदवारीच्या माध्यमातून टाकलेला राजकीय डाव आहे. त्यामुळे ही निवडणूक आता केवळ आकड्यांची नव्हे तर राजकीय प्रभाव, संघटनशक्ती आणि पडद्यामागील हालचालींची परीक्षा मानली जात आहे.

सत्ताधारी महायुतीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्यसंख्येच्या आधारावर ६०० हून अधिक मतांचे संख्याबळ असल्याचे सांगितले जात असले तरी निवडणूक बिनविरोध व्हावी, हे स्वप्न मोहिते-पाटील गटाच्या आक्रमक भूमिकेमुळे धुळीस मिळाले आहे. उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले असून, या लढतीत धैर्यशील मोहिते-पाटील यांनी थेट मैदानात उतरून वातावरण तापवले आहे.

### मोहिते-पाटील पुन्हा केंद्रस्थानी

गेल्या दशकभरात जिल्ह्याच्या मुख्य राजकारणात तुलनेने कमी सक्रिय दिसणारे मोहिते-पाटील कुटुंब विधानपरिषद निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे. लोकसभा, विधानसभा आणि विधानपरिषद अशा विविध निवडणुकांमध्ये प्रस्थापित राजकीय समीकरणांना धक्का देण्याचा इतिहास या घराण्याच्या नावावर आहे.

राजकीय वतुर्ळात अशी चर्चा आहे की, निवडणुकीची रणनीती महायुतीकडून पालकमंत्री जयकुमार गोरे आखत असले तरी विरोधकांच्या हालचालींची सूत्रे मोहिते-पाटील गटाच्या हातात आहेत. त्यामुळे शेवटच्या क्षणी



कोणते राजकीय गणित बदलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### 'अदृश्य हातां'ची चर्चा पुन्हा रंगली

धैर्यशील मोहिते-पाटील यांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केलेला 'आमच्यासोबत ६०० अदृश्य हात आहेत' हा दावा राजकीय चर्चेचा विषय ठरला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांतील अनेक सदस्यांमध्ये असलेली नाराजी, पक्षीय बंधनांपेक्षा स्थानिक राजकीय संबंध आणि पडद्यामागील संपर्क यामुळे मतदानाच्या दिवशी अनपेक्षित निकाल लागू शकतो, अशी चर्चा राजकीय जाणकारांमध्ये सुरू आहे.

मोहिते-पाटील गटाच्या राजकारणाचा इतिहास पाहिला तर अनेक वेळा अशक्य वाटणारी समीकरणे त्यांनी वास्तवात उतरविल्याचे उदाहरणे दिली जातात. त्यामुळे सध्याच्या निवडणुकीतही त्यांच्या भूमिकेकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

### अपक्षांना दिले बळ, प्रस्थापितांना धक्का

जिल्ह्यातील अनेक विधानसभा निवडणुकांमध्ये प्रस्थापित नेत्यांना पराभवाचा धक्का बसला असून त्यामागे मोहिते-पाटील गटाचा अप्रत्यक्ष प्रभाव असल्याची चर्चा अनेकदा झाली आहे.

बार्शी विधानसभा मतदारसंघात तत्कालीन आमदार प्रभावती झाडबुके यांच्या विरोधात दिलीप सोपल यांनी विजय मिळवला. माढा मतदारसंघात सलग दोन वेळा आमदार राहिलेले पांडुरंग पाटील यांना बबनराव शिंदे यांनी पराभूत केले. करमाळा मतदारसंघात जयवंतराव जगताप यांच्याविरोधात दिगंबर बागल यांनी बाजी मारली. या तिन्ही निवडणुकांमध्ये अपक्ष किंवा बंडखोर उमेदवारांनी सत्ताधारी आणि प्रस्थापित नेत्यांना धक्का दिला होता.

राजकीय विश्लेषकांच्या मते, या विजयांमागे केवळ स्थानिक नाराजी नव्हती, तर पडद्यामागे काही प्रभावी राजकीय शक्ती सक्रिय होत्या.

### लोकसभा निवडणुकांमध्येही दिसला प्रभाव

धाराशिव लोकसभा मतदारसंघातील निवडणूकही अशाच चर्चेचा विषय ठरली होती. राष्ट्रवादी काँग्रेसचे लक्ष्मणराव ढोबळे आणि शिवसेनेच्या कल्पना नरहिरे यांच्यात झालेल्या लढतीत अनेक समीकरणे ढोबळे यांच्या बाजूने असल्याचे मानले जात होते. मात्र करमाळा विधानसभा मतदारसंघातील मतदानाच्या कलामुळे निकाल पालटला आणि कल्पना नरहिरे यांनी विजय मिळवला. याचप्रमाणे २००४ मधील पोटनिवडणुकीत काँग्रेसचे आनंदराव देवकते आणि भाजपचे प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्यात झालेल्या लढतीतही काँग्रेसचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या मतदारसंघात अनपेक्षित निकाल लागला होता. त्या निवडणुकीनेही मोहिते-पाटील गटाच्या प्रभावाची चर्चा राज्यभर घडवून आणली होती.

### विधानपरिषद निवडणुकांतील इतिहास

सोलापूरच्या विधानपरिषद निवडणुकांचा इतिहास पाहिला तर अनेक वेळा राजकीय आकडेमोडीला छेद देणारे निकाल लागले आहेत.

१९८५ मध्ये काँग्रेसचे ब्रह्मदेव माने आणि रंगनाथ तोष्णीवाल यांच्यात झालेल्या लढतीत तोष्णीवाल यांचे पारडे जड मानले जात होते. मात्र निकालात ब्रह्मदेव माने विजयी झाले. त्या निवडणुकीत पडद्यामागील राजकीय हालचाली निर्णायक ठरल्याचे सांगितले जाते.

त्यानंतर १९९८ मध्ये काँग्रेसचे युनुस शेख आणि भाजपचे सुभाष देशमुख यांच्यातील निवडणुकीतही असेच चित्र दिसले. काँग्रेसकडे संख्याबळ अधिक असतानाही सुभाष देशमुख यांनी विजय मिळवत पहिल्यांदा विधानपरिषदेची वाट धरली. त्या विजयामागेही स्थानिक राजकारणातील प्रभावी गटांची भूमिका असल्याची चर्चा झाली होती.

### गोरे यांच्यासमोर मोठे आव्हान

महानगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांमधील यशामुळे पालकमंत्री जयकुमार गोरे यांना प्रभावी निवडणूक रणनीतिकार म्हणून ओळखले जाते. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महायुतीचे संख्याबळ पाहता त्यांचा उमेदवार सहज विजयी होईल, असे चित्र सुरुवातीला होते. मात्र मोहिते-पाटील गटाने निवडणूक प्रतिष्ठेची केल्यानंतर परिस्थिती बदलली आहे. मतदानापर्यंत मतदारांशी संपर्क, नाराज गटांचे व्यवस्थापन आणि पक्षीय शिस्त टिकवून ठेवणे हे गोरे यांच्यासमोरील मोठे आव्हान ठरणार आहे.

### निकालाकडे राज्याचे लक्ष

सोलापूर विधानपरिषद निवडणूक आता स्थानिक मयार्दा ओलांडून राज्याच्या राजकारणातील चर्चेचा विषय बनली आहे. एका बाजूला सत्ताधारी महायुतीचे संख्याबळ, तर दुसऱ्या बाजूला मोहिते-पाटील गटाचा राजकीय प्रभाव आणि 'अदृश्य हातां'ची चर्चा यामुळे ही निवडणूक अत्यंत चुरशीची होण्याची चिन्हे आहेत. मतदानाच्या दिवशी आकडे जिंकतात की राजकीय कौशल्य, याचे उत्तर निकालातून मिळणार असले तरी सध्या तरी जिल्ह्याच्या राजकारणात एकच चर्चा आहे — रणनीती गोरे यांची असली तरी डाव मोहिते-पाटलांचा ठरणार का?

# कर्जमाफीच्या निकषात बदल करण्याची तयारी : भरणे

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या निकषात बदल केले जातील, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सोमवारी (ता. ८) सांगितले. राज्याच्या अनेक भागामध्ये मॉन्सूनपूर्व पावसामुळे पिकांची हानी झाली आहे. इंदापूर, बारामती भागातील नुकसानग्रस्त शेतीला भेट दिल्यानंतर माध्यमांशी बोलताना भरणे यांनी निकषात बदल होणार असल्याचे संकेत दिले.

भरणे म्हणाले, "कर्जमाफीच्या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी येत्या दहा दिवसांत सुरू होईल. राज्याच्या साखर कारखान्यांमध्ये हंगामी कामगारांची संख्या मोठी आहे. त्यांना केवळ तीन महिने पगार मिळतो. त्यांना कर्जमाफी योजनेचा लाभ मिळाला पाहिजे.

कर्जमाफी योजनेबाबत शेतकऱ्यांकडून येणाऱ्या सूचना विचारात



घेतल्या जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले, "शेतकरी हितासाठी आवश्यक ते सर्व काही करण्याची तयारी सरकारची आहे. मूळात आमचे सरकार शेतकऱ्यांचे आहे. त्यामुळे शेतकरी वगार्तून येणाऱ्या सूचना विचारात घेतल्या जातील. आवश्यक त्या ठिकाणी योजनेत बदलदेखील करण्यात येतील.

शेतकऱ्यांसाठी उत्पादन वाढ, बाजारभाव चांगले मिळण्यासाठी योग्य ते धोरणात्मक निर्णय घेण्याची भूमिका सरकारची आहे. सरसकट कर्जमाफीची शेतकऱ्यांमधून होणारी मागणी चुकीची नाही. मात्र, सरकार हादेखील एक प्रपंच असतो. सर्वांचा विचार करुन निर्णय घ्यावा लागतो. सध्याच्या कर्जमाफीची रक्कम खूप मोठी आहे. अर्थात, कर्जमाफी हा उपाय नाही. शेतकऱ्यांचे एकूण उत्पन्न सुधारण्यासाठी उपयुक्त तंत्रज्ञान व सुविधा पुरवण्यासाठी सरकारचा प्रयत्न सुरू आहे."

शेतकरी कर्जमाफी जाचक अटींबाबत आमदार रोहित पवार यांनी दिलेल्या आंदोलनाच्या इशाऱ्याबद्दल छेडले असता भरणे म्हणाले, "मी कोणावरही टीका करणार नाही. मात्र, मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी शेतकरी कर्जमाफीचा चांगला निर्णय घेतला आहे. त्यामुळेच ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५५५ कोटी रुपयांची कर्जमाफी दिली जाणार आहे. कर्जमाफीच्या निकषांबाबत सरकार लवचिक आहे. निकषात बदल करीत जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ देण्याकडे सरकारचा कल राहील."

### उपाययोजनांना प्राधान्य

कृषिमंत्री भरणे म्हणाले, "राज्यावर एल निनोचे संकट असून यंदा कमी पावसाचा अंदाज आहे. त्यामुळे राज्य सरकार पाण्याच्या नियोजनासह जलसंधारणाच्या कार्यक्रमांवरदेखील भर देते आहे. दुष्काळास सहनशील बियाण्यांचे वाटप, शेततळ्यांची निर्मिती तसेच इतर उपाययोजनांना प्राधान्य दिले जात आहे. कमी पावसाच्या अंदाजामुळे शेतकऱ्यांनी पेरण्यांची घाई करू नये. १५ जूनपर्यंत पावसाची स्थिती अभ्यासून पेरण्यांचे नियोजन करावे."

### पावसाचा अंदाज घेत पेरण्या करा

राज्यातील एक लाख एकरहून अधिक क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे सुरू असून सर्व अहवाल प्राप्त होताच १० दिवसांच्या आत मदत केली जाईल, असेही कृषिमंत्री भरणे म्हणाले.

# राज्यातील 30 जिल्ह्यांना विजांच्या कडकडाटासह पावसाचा इशारा

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यात उन्हाच्या तीव्र झळा आणि घामाच्या धारांनी नागरिक हैराण झालेले असतानाच आता हवामानात एक मोठा आणि अचानक बदल झाला आहे. तुम्ही पुढच्या काही दिवसांत घराबाहेर पडण्याचा किंवा प्रवासाचा प्लॅन करत असाल, तर ही बातमी तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

हवामान विभागाने राज्यासाठी एक मोठा इशारा जारी केला असून राज्यातील तब्बल 30 जिल्ह्यांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. मुंबई



आणि पुण्यासह महाराष्ट्राच्या मोठ्या भागाला पावसाचा दणका बसणार असून अनेक जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी वारे वाहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

### हवामान विभागाचा तब्बल 30 जिल्ह्यांना यलो अलर्ट

भारतीय हवामान विभागाने म्हणजेच आयएमडीने 9 जून 2026 रोजी राज्यातील 30 जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट जारी केला आहे. यामध्ये मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, अहमदनगर, धुळे, नंदुरबार, बीड, परभणी, लातूर, धाराशिव, नांदेड, हिंगोली, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, वाशीम आणि यवतमाळ या सर्व जिल्ह्यांचा समावेश आहे. या जिल्ह्यांमध्ये काही भागांत ताशी 40 ते 50 किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहतील, तसेच मध्यम स्वरूपाच्या पावसासह विजांचा कडकडाट होण्याची दाट शक्यता आहे.

### चार दिवस पावसाचा जोर कायम

हा पावसाचा जोर केवळ एका दिवसापुरता मर्यादित नसून, 10 जून ते 13 जून 2026 या कालावधीत मुंबई, ठाणे आणि पुणे परिसरात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची मालिका सुरूच राहण्याची शक्यता आहे.

# जुनी मिलच्या १३७ एकर जागेतील बोगस गृहनिर्माण संस्थांवर कारवाईचा फास आवळला; उमा सहकारी संस्थेसह २० संस्था अवसायनात

## ३६ वर्षांपासून गाजत असलेल्या हजारो कोटींच्या भूखंड प्रकरणाला नवे वळण; अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामांवर कारवाईचे संकेत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** सोलापुरातील जुनी मिल ट्रस्टच्या १३७ एकर जागेशी संबंधित बहुचर्चित आणि वादग्रस्त प्रकरणात मोठी प्रशासकीय घडामोड घडली असून बोगस असल्याचा आरोप असलेल्या उमा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादितसह एकूण २० गृहनिर्माण संस्थांवर अवसायनाची कारवाई करण्यात आली आहे. सहकार विभागाने विविध नियमांचे उल्लंघन, माहिती सादर न करणे, लेखापरीक्षण अहवाल न देणे आणि निवडणुका न घेणे आदी कारणांवरून या संस्थांवर कारवाई करत प्रशासकांची नियुक्ती केली असल्याची माहिती जुनी मिल बेकार कामगार, वारसदार आणि जनहित संघर्ष समितीचे सचिव डॉ. संदीप आडके यांनी दिली आहे.

उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर सोलापूर कार्यालयाच्या आदेशानुसार दि. २९ मे २०२६ रोजी उमा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित ही संस्था अवसायनात काढण्यात आली असून संस्थेच्या कामकाजासाठी अवसायक म्हणून दत्तात्रय कारंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

यापूर्वी उमा सहकारी गृहनिर्माण संस्था क्रमांक १ ते १०, १२-ब,



१२-क, १३, १३-अ, १३-ब, १४, वॉटर फ्रंट फेज-१, वॉटर फ्रंट फेज-२ तसेच द स्क्वेअर फ्लॅट अँड शॉप ओनर्स को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी अशा एकूण १९ संस्थांवरही अशीच कारवाई करण्यात आली होती.

जुनी मिल बेकार कामगार, वारसदार आणि जनहित संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या मते, भूखंड प्रकरणातील प्रमुख आरोपी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुमार शंकर करजगी यांनी १९९८ मध्ये उमा सहकारी गृहनिर्माण संस्थेची नोंदणी केली होती. त्यानंतर या संस्थेच्या नावाखाली सुमारे २० पोटसंस्था निर्माण करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

समितीच्या दाव्यानुसार, सुरुवातीला बाळे येथील गट क्रमांक १/१ मधील कृषी जमिनीच्या आधारे संस्थेची नोंदणी करण्यात आली. त्यानंतर विविध शासकीय कार्यालयांतील अधिकाऱ्यांच्या संगनमतातून जुनी मिल ट्रस्टच्या मालकीच्या १३७ एकर जागेवर या संस्थांचे नाव लावण्यात आले.

वादग्रस्त १३७ एकर जागेमध्ये जुनी मिल कंपाऊंड, मुरारजी पेठ, कंबर तलाव परिसर, मोतीबाग, उमा नगरी आणि एसटी स्टँडसमोरील धरमसी लाईन या महत्त्वाच्या भागांचा समावेश आहे. या सर्व भागातील जमिनींचे व्यवहार गेल्या अनेक वर्षांपासून वादाच्या केंद्रस्थानी आहेत.

समितीच्या माहितीनुसार, १९८९ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जुनी मिल ट्रस्टच्या सुमारे १,१०० सदस्यांनी ९ कोटी ३६ लाख रुपये जमा करून ही १३७ एकर जागा ट्रस्टच्या नावे घेतली होती.

मात्र त्यानंतर या जागांमध्ये मोठ्या प्रमाणावर भूखंड घोटाळा झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. अनेक भूखंड कथित बोगस कागदपत्रांच्या आधारे विकण्यात आले, बिल्डरांशी करार करण्यात आले तसेच काही मालमत्ता गहाण ठेवण्यात आल्याचा दावा समितीने केला आहे. या प्रकरणी २०१७ मध्ये फौजदारी गुन्हे दाखल झाले असून संबंधित प्रकरण सध्या सोलापूर जिल्हा न्यायालयात सुरू आहे. प्रकरणातील काही प्रमुख कुमार करजगी व सुरेंद्र कर्णिक हे आरोपी जामिनावर असल्याची माहिती समितीने दिली आहे.

समितीच्या म्हणण्यानुसार, संबंधित गृहनिर्माण संस्थांच्या नावावरील ले-आउट रद्द करण्यात आले आहेत. नगर भूमापन विभागाने मोजणी प्रक्रिया थांबवली आहे, तर दुय्यम निबंधक कार्यालयाने खरेदी-विक्री व्यवहारांवर निर्बंध आणले आहेत.

सोलापूर महानगरपालिकेनेही या परिसरातील नवीन बांधकाम परवानग्या रोखल्या असून अनेक बांधकामांना अद्याप वापर परवाना देण्यात आलेला नसल्याचा दावा करण्यात आला आहे. २०१९ मध्ये जुनी मिल ट्रस्टची नोंद धर्मादाय आयुक्त कार्यालयात करण्यात आली होती. त्यामुळे (पान 2 वर..)



## संपादकीय

# तरुणांचा रोष आणि नव्या राजकारणाची चाहूल

नीट पेपरफुटी, सीबीएसई परीक्षा आणि शिक्षण व्यवस्थेबद्दलचा वाढता असंतोष यामुळे देशातील तरुणांमध्ये तीव्र नाराजी आहे. सीजेपीच्या आंदोलनाने पारंपरिक राजकारणासमोर नवे प्रश्न उभे करत नव्या राजकीय शक्यतांकडे लक्ष वेधले आहे.

राजधानी दिल्लीतील राजकारणाचा केंद्रबिंदू ठरला आहे नीट परीक्षा प्रश्नपत्रिका फुटीचा वाद, सीबीएसईच्या परीक्षा पद्धतीबाबत निर्माण झालेले प्रश्न आणि त्याविरोधात उभा राहिलेला तरुणांचा संताप. तरुणांच्या रोषाचे मुख्य लक्ष्य शिक्षण मंत्रालय बनले आहे. हा रोष अधिक व्यापक करण्याचे काम 'कॉक्रोच जनता पार्टी' (सीजेपी) या संघटनेने केले. सोशल मीडियापुरते मर्यादित न राहता त्यांनी रस्त्यावर उतरून ताकद दाखवली आणि त्यामुळे राजधानीतील राजकीय वातावरण आणखी तापले. या आंदोलनाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे काँग्रेस त्याला भाजप प्रायोजित कार्यक्रम म्हणत होती, तर भाजप त्याला तथाकथित 'टुकडे-टुकडे गँग'चा विस्तार म्हणून संबोधत होती; मात्र आंदोलन करणारी सीजेपी या दोन्ही आरोपांपासून स्वतःला दूर ठेवत होती. तथापि, आंदोलनाची शैली आणि काही घटनांकडे बारकाईने पाहिल्यास दोन्ही बाजूंच्या आरोपांमध्ये काहीअंशी तथ्य असल्याचे जाणवते.

जंतर-मंतरवर आंदोलनासाठी सीजेपीला अत्यंत तातडीने परवानगी मिळणे, आंदोलनादरम्यान दिल्ली पोलिसांचा सहकार्यशील दृष्टिकोन, तसेच अण्णा आंदोलनाप्रमाणे प्रचंड उन्हात आंदोलनकर्त्यांसाठी मोफत पॅकेटबंद पाण्याची व्यवस्था अशा काही बाबी काँग्रेसच्या आरोपांना बळ देताना दिसतात. दुसरीकडे, आंदोलनकर्त्यांनी वापरलेली गीते, घोषणाबाजी आणि आंदोलनाची शैली पाहता त्यात जेएनयू संस्कृतीची स्पष्ट छाप दिसत होती. त्यामुळे भाजपचा आरोप पूर्णपणे नाकारता येत नाही.

यातील आणखी एक लक्षवेधी बाब म्हणजे, अभिजित दीपके हे सतत आपल्या मोबाईलवर काही संदेश पाहत होते आणि त्यानुसार सहकाऱ्यांना सूचना देत होते. यावरून त्यांना कुठून तरी मार्गदर्शन मिळत असल्याचा अंदाज व्यक्त केला जातो. सीजेपीच्या आंदोलनातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे 'जय भीम' या घोषणेचा सातत्याने वापर. हा नारा भारतीय लोकशाही आणि सामाजिक न्यायाच्या राजकारणाचे महत्त्वाचे प्रतीक आहे; मात्र जेव्हा आंदोलनाचा घोषित विषय परीक्षा व्यवस्था आणि शिक्षणाशी संबंधित प्रश्न असतो, तेव्हा अशा घोषणेचा वारंवार वापर स्वाभाविकपणे राजकीय अर्थ धारण करतो. हा केवळ संविधाननिष्ठेचा आविष्कार होता की, त्यामागे व्यापक सामाजिक-राजकीय संदेश दडलेला होता, हा प्रश्न उपस्थित होतो.

विशेषतः महाराष्ट्रात दलित राजकारण बराच काळ नव्या नेतृत्वाच्या शोधात असल्याचे दिसून येते. जुन्या नेतृत्वाचा प्रभाव मर्यादित होत चालला आहे. अशा परिस्थितीत एखादा नवा सामाजिक-राजकीय मंच 'जय भीम'सारख्या प्रतीकांच्या आधारे तरुणांना संघटित करण्याचा प्रयत्न करत असेल, तर त्याचे दूरगामी राजकीय परिणाम असू शकतात; मात्र या टप्प्यावर कोणताही ठोस निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल, तरीही या संकेतांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करणेही योग्य ठरणार नाही.

नीट प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणानंतर काँग्रेसने विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ रस्त्यावर उतरून आंदोलन सुरू केले होते. काँग्रेसच्या युवक संघटनेने जयपूरमध्ये मोठे आंदोलन करून प्रसिद्धी मिळवली होती. त्यानंतर देशभरात अशाच प्रकारच्या आंदोलनांची मालिका सुरू झाली. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागली. नीट घोटाळा आणि सीबीएसई परीक्षांमधील कथित अनियमिततांमुळे तरुणांमध्ये सरकारविषयी तीव्र नाराजी निर्माण झाली होती. काँग्रेस या नाराजीचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न करत होती आणि ४४ अंश सेल्सिअसच्या उष्णतेतही रस्त्यावर उतरून सक्रिय दिसत होती. त्यामुळे तरुणांचा कल काँग्रेसकडे वळण्याची शक्यता निर्माण झाली होती; मात्र याच काळात सीजेपीचा उदय झाला आणि ती अनेक तरुणांची पसंतीची संघटना बनल्याचे चित्र दिसू लागले. आश्चर्याची बाब म्हणजे, आंदोलनाची तारीख आणि वेळ पूर्वनिश्चित असूनही परवानगीसाठी अर्ज काही तास आधीच करण्यात आला आणि प्रशासनाने त्वरित परवानगी दिली. साधारणपणे अशा परवानग्यांसाठी काही दिवस आधी अर्ज करावा लागतो आणि तरीही अनेक संघटनांना परवानगी मिळत नाही. त्यामुळे या सर्व घटनाक्रमांमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले.

सीजेपीचे आंदोलन कव्हर करण्यासाठी जमलेली माध्यमांची गर्दी अण्णा हजारे यांच्या आंदोलनाची आठवण करून देणारी होती. त्या काळातही प्रादेशिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय माध्यमांनी जंतर-मंतरला आपले केंद्र बनवले होते; मात्र अण्णा आंदोलनाने देशव्यापी स्वरूप धारण केल्यानंतरच आंतरराष्ट्रीय माध्यमांनी त्याकडे गांभीर्याने लक्ष दिले होते. सीजेपीच्या बाबतीत मात्र पहिल्याच आंदोलनात आंतरराष्ट्रीय माध्यमांची उपस्थिती दिसून आली. हे सरकारसाठी सकारात्मक संकेत मानले जाऊ शकत नाहीत. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर इतिहासातील एका संकल्पनेची आठवण वारंवार होते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेबाबत काही इतिहासकार 'सेफ्टी व्हॉल्व्ह सिद्धांत' मांडतात. या सिद्धांतानुसार ब्रिटिश सत्तेला वाढत्या जनअसंतोषाला नियंत्रित राजकीय व्यासपीठ उपलब्ध करून द्यायचे होते. या सिद्धांताबाबत इतिहासकारांमध्ये मतभेद असले, तरी राजकीय चर्चेत त्याचा उल्लेख आजही होतो. सीजेपीबाबतही काही जण अशाच प्रकारचे प्रश्न उपस्थित करत आहेत.

आंदोलन यशस्वी होते की अपयशी, या चर्चेपलीकडे एक गोष्ट स्पष्ट झाली. शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा झाला, तर त्याचे राजकीय श्रेय विरोधकांना मिळेलच असे नाही. या संपूर्ण प्रकरणातील सर्वात लक्षवेधी बाब म्हणजे अमेरिकेत बसलेला एक तरुण सोशल मीडियाच्या माध्यमातून पक्ष स्थापन करतो आणि अवघ्या एका महिन्यात त्याचे आंदोलन रस्त्यावर उतरते. सामान्यतः एखादा पक्ष उभारण्यासाठी आणि आंदोलन उभे करण्यासाठी मोठी कार्यकर्त्यांची फौज उभी करावी लागते; मात्र येथे कोणत्याही दृश्यमान संघटनात्मक यंत्रणेशिवाय केवळ सोशल मीडियाच्या जोरावर आंदोलन उभे राहिल्याचा दावा केला जात आहे. ही गर्दी खरोखरच स्वयंप्रेरणेने जमली असेल, तर ते केवळ सरकारसाठीच नव्हे, तर विरोधकांसाठीही चिंतेचे कारण आहे. कारण, याचा अर्थ असा होतो की, सरकारवर नाराज असलेल्या लोकांचा विरोधकांवरही विश्वास राहिलेला नाही आणि जर ही गर्दी स्वयंप्रेरित नसेल, तर कोणताही राजकीय पक्ष तिला 'हायजॅक' करून स्वतःच्या राजकीय हेतूंसाठी वापरू शकतो. याशिवाय आंदोलनात विविध विचारसरणींच्या गटांचा सहभाग दिसून येत होता. त्यामुळे आज ही चळवळ कोणाच्या नियंत्रणाखाली दिसत असली, तरी भविष्यात ती त्याच नियंत्रणाखाली राहील, याची खात्री देता येत नाही.

सीजेपीबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. हा तरुणांच्या रोषाला दिशा देण्याचा प्रयत्न आहे का? तो एखाद्या मोठ्या राजकीय समीकरणाचा भाग आहे का? की पारंपरिक राजकारणाला आव्हान देणारे हे खरोखरच एक स्वयंस्फूर्त डिजिटल आंदोलन आहे? एक गोष्ट निर्विवाद आहे, हजारो तरुण कोणत्याही प्रस्थापित संघटनात्मक चौकटीशिवाय केवळ सोशल मीडियावरील आवाहनावरून रस्त्यावर उतरू लागले असतील, तर ते भारतीय राजकारणासाठी एका नव्या युगाचे संकेत आहेत. याचा अर्थ असा असू शकतो की, तरुणांचा एक मोठा वर्ग पारंपरिक राजकीय पक्षांबद्दल निराश झाला आहे आणि आपली मते मांडण्यासाठी नवी व्यासपीठे शोधत आहे. दुसरी शक्यता अशी की, राजकीय पक्ष डिजिटल माध्यमांचा वापर करून जनसक्रियतेचे नवे मॉडेल उभारत आहेत. या दोन्ही शक्यता लोकशाहीसाठी महत्त्वाच्या आहेत. पहिली पारंपरिक राजकारणासाठी इशारा आहे, तर दुसरी लोकशाही प्रक्रियेत अधिक पारदर्शकतेची मागणी करणारी आहे. अशा स्थितीत भारतीय राजकारण एका नव्या वळणावर उभे असल्याचे दिसते.

# नेत्रदान : प्रकाशाचा अमूल्य वारसा

मानवी शरीरातील प्रत्येक अवयव महत्त्वाचा असला तरी डोळ्यांचे स्थान सर्वाधिक अनन्यसाधारण आहे. डोळे हे केवळ शरीराचा एक अवयव नसून ते ज्ञान, अनुभव, सौंदर्य आणि जगाशी संवाद साधण्याचे माध्यम आहेत. या डोळ्यांमुळेच माणूस निसर्गातील विविध रंग अनुभवतो, आपल्या प्रिय व्यक्तींचे चेहरे पाहतो, शिक्षण घेतो, काम करतो आणि जीवनातील असंख्य आनंदाचे क्षण अनुभवतो. दृष्टी ही मानवाला लाभलेली एक अनमोल देणगी आहे. ज्यांच्या डोळ्यांतून जगाचे दर्शन घडते, त्यांना दृष्टीचे महत्त्व कदाचित नेहमी जाणवत नाही; परंतु ज्यांनी दृष्टी गमावली आहे किंवा ज्यांना जन्मतःच अंधत्व लाभले आहे, त्यांच्यासाठी दृष्टी म्हणजे संपूर्ण आयुष्य बदलून टाकणारी शक्ती असते. अशा लाखो अंध आणि दृष्टीदोषग्रस्त व्यक्तींच्या जीवनात प्रकाश आणण्याची क्षमता नेत्रदानामध्ये आहे. म्हणूनच दरवर्षी १० जून रोजी जागतिक नेत्रदान दिन साजरा केला जातो. हा दिवस केवळ जनजागृतीचा कार्यक्रम नसून मानवतेचा, सामाजिक जबाबदारीचा आणि परोपकाराचा संदेश देणारा महत्त्वपूर्ण दिवस आहे.

नेत्रदान म्हणजे मृत्यूनंतर एखाद्या व्यक्तीच्या डोळ्यांतील कॉर्निया किंवा नेत्रपटल दान करणे. कॉर्निया हा डोळ्याचा सर्वात बाहेरील पारदर्शक भाग असून तो प्रकाश डोळ्याच्या आत पोहोचवण्याचे काम करतो. कॉर्नियामध्ये दोष निर्माण झाल्यास व्यक्तीला अंशतः किंवा पूर्ण अंधत्व येऊ शकते. आधुनिक वैद्यकीय विज्ञानामुळे अशा रुग्णांवर कॉर्निया प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करून त्यांची दृष्टी पुन्हा मिळवून देता येते. मृत्यूनंतर दान केलेल्या एका व्यक्तीच्या दोन्ही डोळ्यांमधील कॉर्निया दोन वेगवेगळ्या व्यक्तींना उपयोगी पडू शकतात. त्यामुळे एका व्यक्तीच्या नेत्रदानातून दोन अंध व्यक्तींच्या जीवनात प्रकाश निर्माण होऊ शकतो. म्हणूनच नेत्रदानाला "महादान" असेही म्हटले जाते.

दृष्टी ही व्यक्तीच्या जीवनमानाशी थेट संबंधित असते. एखादी व्यक्ती दृष्टी गमावते तेव्हा तिच्या जीवनातील अनेक शक्यता मर्यादित होतात. शिक्षण, रोजगार, प्रवास, सामाजिक संबंध आणि दैनंदिन जीवनातील अनेक कामे कठीण बनतात. अंधत्वामुळे व्यक्तीला मानसिक, सामाजिक आणि आर्थिक समस्यांनाही सामोरे जावे लागते. अनेकदा कुटुंबातील इतर सदस्यांवरही त्याचा परिणाम होतो. अशा परिस्थितीत नेत्रदानाद्वारे मिळालेली दृष्टी केवळ एका व्यक्तीच्या डोळ्यांमध्ये प्रकाश आणत नाही, तर त्याच्या संपूर्ण जीवनात आशेची नवी पहाट निर्माण करते. त्यामुळे नेत्रदान हे केवळ वैद्यकीय प्रक्रिया नसून मानवतेचे श्रेष्ठ उदाहरण आहे.

जगभरात अंधत्व ही एक गंभीर आरोग्य समस्या मानली जाते. विविध आंतरराष्ट्रीय अभ्यासांनुसार कोट्यवधी लोक काही ना काही प्रकारच्या दृष्टीदोषाने ग्रस्त आहेत. त्यापैकी लाखो लोक कॉर्नियाच्या आजारांमुळे अंधत्व अनुभवत आहेत. अनेकांना कॉर्निया प्रत्यारोपणाची गरज असते; परंतु दानासाठी उपलब्ध होणाऱ्या कॉर्नियांची संख्या अत्यल्प असल्यामुळे हजारो रुग्ण प्रतीक्षा यादीत राहतात. भारतामध्येही ही समस्या मोठ्या प्रमाणावर आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात अंधत्व आणि दृष्टीदोषाचे प्रमाण मोठे असून कॉर्नियाच्या अंधत्वामुळे अनेक व्यक्तींचे जीवन प्रभावित झाले आहे. देशभरात दरवर्षी लाखो कॉर्नियांची आवश्यकता असताना प्रत्यक्षात उपलब्ध होणाऱ्या नेत्रांची संख्या त्यापेक्षा खूपच कमी आहे. ही तफावत दूर करण्यासाठी व्यापक जनजागृतीची आवश्यकता आहे.

भारतातील नेत्रदान चळवळीचा इतिहास प्रेरणादायी आहे. विसाव्या शतकाच्या मध्यापासून नेत्रदान आणि कॉर्निया प्रत्यारोपणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण प्रगती झाली. विविध वैद्यकीय संस्था, नेत्ररोगतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि स्वयंसेवी संस्थांनी नेत्रदानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. देशातील अनेक शहरांमध्ये आय बँकांची स्थापना करण्यात आली. आय बँक म्हणजे नेत्रदानातून प्राप्त झालेले कॉर्निया सुरक्षित ठेवण्याची, त्यांची तपासणी करण्याची आणि योग्य रुग्णांना उपलब्ध करून देण्याची व्यवस्था होय. या संस्थांमुळे नेत्रदान आणि प्रत्यारोपण प्रक्रिया अधिक प्रभावी बनली आहे. तरीही लोकसंख्येच्या तुलनेत नेत्रदानाचे प्रमाण वाढविण्याची गरज कायम आहे.

नेत्रदानाच्या संदर्भात सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते मृत्यूनंतर केले जाते. जिवंत असताना व्यक्तीला कोणतीही शारीरिक हानी न होता ती नेत्रदानाचा संकल्प करू शकते. व्यक्तीच्या मृत्यूनंतर साधारणपणे चार ते सहा तासांच्या आत प्रशिक्षित वैद्यकीय पथक कॉर्निया संकलित करते. ही प्रक्रिया अत्यंत काळजीपूर्वक आणि सन्मानपूर्वक केली जाते. मृतदेहाचे विद्रूपीकरण होत नाही, चेहऱ्याच्या स्वरूपात कोणताही बदल होत नाही आणि अंत्यदर्शन किंवा धार्मिक विधींमध्ये कोणताही अडथळा निर्माण होत नाही. त्यामुळे नेत्रदानाबाबत असलेली भीती किंवा गैरसमज दूर करणे आवश्यक आहे.

समाजामध्ये नेत्रदानासंदर्भात अनेक गैरसमज आजही आढळतात. काही लोकांना वाटते की नेत्रदान केल्याने पुढील जन्मात



अंधत्व येऊ शकते. काहींना असे वाटते की मृतदेहाचा अपमान होतो किंवा धार्मिक परंपरांचा भंग होतो. काही लोकांना नेत्र काढण्याच्या प्रक्रियेची भीती वाटते. प्रत्यक्षात या सर्व समजुती निराधार आहेत. जगातील प्रमुख धर्म मानवसेवा, परोपकार आणि दान यांना सर्वोच्च स्थान देतात. कोणताही धर्म नेत्रदानाला विरोध करत नाही. उलट दुसऱ्याला दृष्टीदान देणे हे अत्यंत पुण्याचे कार्य मानले जाते. त्यामुळे धार्मिक किंवा सांस्कृतिक कारणांमुळे नेत्रदान टाळण्याचे कोणतेही कारण नाही.

भारतीय संस्कृतीमध्ये दानधर्माला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. अन्नदान, वस्त्रदान, विद्यादान, रक्तदान यांसारख्या अनेक दानपरंपरा आपल्या समाजात प्राचीन काळापासून अस्तित्वात आहेत. नेत्रदान ही या दानपरंपरेची आधुनिक आणि अत्यंत प्रभावी अभिव्यक्ती आहे. मृत्यूनंतरही दुसऱ्याच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्याची क्षमता या दानामध्ये आहे. त्यामुळे नेत्रदान ही केवळ वैद्यकीय गरज नसून सामाजिक आणि नैतिक जबाबदारीदेखील आहे.

अंधत्वाचा परिणाम केवळ व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही. कुटुंबातील इतर सदस्यांनाही त्याचा मोठा फटका बसतो. अंध व्यक्तीला दैनंदिन कामांसाठी इतरांवर अवलंबून राहावे लागते. शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सहभागाच्या संधी कमी होतात. काही वेळा कुटुंबातील एखाद्या सदस्याला त्याची काळजी घेण्यासाठी स्वतःच्या करिअरमध्ये तडजोड करावी लागते. अशा परिस्थितीत जर त्या व्यक्तीला कॉर्निया प्रत्यारोपणाद्वारे दृष्टी मिळाली तर संपूर्ण कुटुंबाचे जीवन बदलू शकते. त्यामुळे नेत्रदानाचा लाभ केवळ एका व्यक्तीला नाही तर संपूर्ण समाजाला मिळतो.

**विशेषतः** बालकांमध्ये नेत्रदानाचे महत्त्व अधिक आहे. लहान वयात कॉर्नियाशी संबंधित अंधत्व आल्यास मुलांच्या शारीरिक, मानसिक आणि शैक्षणिक विकासावर गंभीर परिणाम होतो. दृष्टीअभावी त्यांना शिक्षण घेणे, खेळणे आणि सामाजिक कौशल्ये विकसित करणे कठीण जाते. योग्य वेळी कॉर्निया प्रत्यारोपण झाल्यास अशा मुलांचे जीवन पूर्णपणे बदलू शकते. ते इतर मुलांप्रमाणे शिक्षण घेऊ शकतात, करिअर घडवू शकतात आणि समाजात स्वाभिमानाने जगू शकतात. म्हणूनच नेत्रदान हे भविष्य घडविणारे दान मानले जाते.

जागतिक नेत्रदान दिनाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे समाजामध्ये नेत्रदानाबाबत जागरूकता निर्माण करणे. अनेक लोकांना नेत्रदानाची प्रक्रिया, त्याचे फायदे आणि त्यामागील वैज्ञानिक सत्य यांची माहिती नसते. त्यामुळे विविध शासकीय संस्था, आरोग्य विभाग, वैद्यकीय महाविद्यालये आणि स्वयंसेवी संस्था या दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात. जनजागृती रॅली, व्याख्याने, चर्चासत्रे, नेत्रतपासणी शिबिरे, निबंध स्पर्धा आणि सामाजिक माध्यमांवरील मोहिमा यांद्वारे लोकांपर्यंत संदेश पोहोचविला जातो. या उपक्रमांमुळे समाजामध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होण्यास मदत होते.

ग्रामीण भारतामध्ये नेत्रदानाविषयी जागरूकतेचा अभाव तुलनेने अधिक आहे. अनेक गावांमध्ये आय बँकांची माहिती उपलब्ध नसते. काही ठिकाणी अंधश्रद्धा आणि गैरसमज अधिक प्रमाणात आढळतात. त्यामुळे ग्रामीण भागात विशेष मोहिमा राबविण्याची गरज आहे. आशा सेविका, अंगणवाडी कार्यकर्त्या, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक आणि स्थानिक स्वयंसेवी संस्था यांच्या माध्यमातून जनजागृती वाढविता येऊ शकते. ग्रामीण समाजामध्ये विश्वासार्ह स्थान असलेल्या व्यक्तींनी नेत्रदानाचा प्रचार केल्यास त्याचा अधिक परिणाम होऊ शकतो.

शिक्षण क्षेत्राची भूमिकाही या संदर्भात अत्यंत महत्त्वाची आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना नेत्रदानाविषयी माहिती देणे आवश्यक आहे. युवक वर्ग हा समाजातील परिवर्तनाचा प्रमुख घटक आहे. जर तरुण पिढीने नेत्रदानाचा स्वीकार केला, तर भविष्यात नेत्रदानाचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढू शकते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करून अंधश्रद्धा दूर करण्याचे काम शिक्षण संस्थांमार्फत प्रभावीपणे करता येते.

प्रसारमाध्यमे ही जनजागृतीची प्रभावी साधने आहेत. वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि डिजिटल माध्यमांद्वारे नेत्रदानाविषयी माहिती व्यापक प्रमाणात पोहोचविता येते. यशस्वी कॉर्निया प्रत्यारोपण झालेल्या व्यक्तींच्या कथा समाजापर्यंत पोहोचवल्यास लोकांमध्ये प्रेरणा निर्माण होते. एखाद्या व्यक्तीने पुन्हा आपल्या आई-वडिलांचा चेहरा पाहिला, आपल्या मुलांना पाहिले किंवा अनेक वर्षांनंतर निसगार्चा अनुभव घेतला, अशा कथा लोकांच्या मनाला स्पर्श करतात आणि नेत्रदानाबाबत सकारात्मक विचार निर्माण करतात.

वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे आज कॉर्निया प्रत्यारोपणाची यशस्वीता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. अत्याधुनिक शस्त्रक्रिया तंत्रज्ञान, सुधारित जतन पद्धती आणि प्रशिक्षित तज्ज्ञांमुळे अनेक रुग्णांना उत्तम परिणाम मिळत आहेत. त्यामुळे नेत्रदानातून मिळणाऱ्या लाभांची व्याप्ती अधिक वाढली आहे. भविष्यात जैवतंत्रज्ञान आणि संशोधनामुळे या क्षेत्रात आणखी प्रगती होण्याची अपेक्षा आहे. तथापि, कोणतेही तंत्रज्ञान उपलब्ध असले तरी दानासाठी आवश्यक कॉर्निया मिळाले नाहीत तर प्रत्यारोपण शक्य होणार नाही. म्हणूनच नेत्रदानाची गरज कायम महत्त्वाची राहणार आहे.

नेत्रदानाचा निर्णय वैयक्तिक असला तरी त्याची अंमलबजावणी कुटुंबाच्या सहकार्यावर अवलंबून असते. अनेक वेळा व्यक्तीने नेत्रदानाचा संकल्प केलेला असतो; परंतु मृत्यूनंतर कुटुंबीयांना त्याची माहिती नसल्यामुळे दान होऊ शकत नाही. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या कुटुंबीयांशी या विषयावर चर्चा करणे आवश्यक आहे. मृत्यूनंतर आपले नेत्र दान करण्याची इच्छा स्पष्टपणे व्यक्त करणे गरजेचे आहे. अशा संवादामुळे कुटुंबीयही या निर्णयाचा सन्मान करण्यास तयार होतात.

समाजातील प्रसिद्ध व्यक्तींची भूमिका देखील महत्त्वाची आहे. कलाकार, साहित्यिक, क्रीडापटू, सामाजिक कार्यकर्ते आणि धार्मिक नेते यांनी नेत्रदानाचा संदेश दिल्यास त्याचा व्यापक प्रभाव पडतो. अनेक लोक आपल्या आदर्श व्यक्तींचे अनुकरण करतात. त्यामुळे सार्वजनिक जीवनातील व्यक्तींनी नेत्रदानाविषयी खुलेपणाने भूमिका मांडणे आवश्यक आहे. त्यांच्या सहभागामुळे जनजागृती मोहिमांना अधिक बळ मिळू शकते.

नेत्रदान आणि मानवता यांचा अतूट संबंध आहे. माणूस आपल्या आयुष्यात अनेक प्रकारे समाजासाठी योगदान देतो; परंतु मृत्यूनंतरही समाजाच्या सेवेसाठी काहीतरी देऊन जाण्याची संधी फार कमी क्षेत्रांमध्ये उपलब्ध असते. नेत्रदान ही अशीच एक संधी आहे. जीवनाचा शेवट हा दुसऱ्या कोणाच्या नव्या सुरुवातीचे कारण ठरू शकतो. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिचे नेत्र दोन अंध व्यक्तींना प्रकाश देऊ शकतात, ही कल्पनाच किती प्रेरणादायी आहे.

आजच्या काळात नेत्रदानाबाबतची माहिती मिळविणे आणि नोंदणी करणेही सोपे झाले आहे. विविध शासकीय आणि स्वयंसेवी संस्थांमार्फत नोंदणीची सुविधा उपलब्ध आहे. तथापि, केवळ नोंदणी करून थांबणे पुरेसे नाही. समाजामध्ये या विषयावर संवाद वाढविणे, इतरांना प्रेरित करणे आणि नेत्रदानाच्या चळवळीला लोकचळवळीचे स्वरूप देणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक कुटुंब आणि प्रत्येक संस्था या कार्यात सहभागी झाली तर अंधत्वाविरुद्धची लढाई अधिक प्रभावी ठरू शकते.

जागतिक नेत्रदान दिन हा आपल्याला आपल्या सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणारा दिवस आहे. दृष्टी ही जीवनातील अमूल्य संपत्ती आहे आणि ती दुसऱ्याला देण्याची संधी नेत्रदानामध्ये आहे. आपण जिवंत असताना समाजासाठी जे काही करतो, त्यापलीकडे जाऊन मृत्यूनंतरही दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करण्याची ताकद या दानामध्ये आहे. त्यामुळे नेत्रदान ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नाही, तर ती मानवतेचा उत्सव आहे.

मानवजातीच्या इतिहासात दान, त्याग आणि परोपकार यांना नेहमीच सर्वोच्च स्थान मिळाले आहे. नेत्रदान ही त्या परंपरेची आधुनिक अभिव्यक्ती आहे. एखाद्या अंध व्यक्तीच्या डोळ्यांत पुन्हा प्रकाश निर्माण करणे, त्याला स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची संधी देणे यापेक्षा मोठी मानवसेवा कोणती असू शकते? म्हणूनच प्रत्येकाने नेत्रदानाचा गांभीर्याने विचार करावा. आपल्या कुटुंबीयांशी याबाबत चर्चा करावी आणि समाजामध्येही या विषयाची जागरूकता वाढवावी.

अखेरीस असे म्हणता येईल की, नेत्रदान म्हणजे मृत्यूनंतरही जिवंत राहण्याचा एक सुंदर मार्ग आहे. शरीर नश्वर असले तरी आपल्या नेत्रांमधून निर्माण झालेला प्रकाश अनेक वर्षे दुसऱ्यांच्या आयुष्यात झळकत राहू शकतो. अंधाराने वेढलेल्या एखाद्या जीवनात आशेचा किरण निर्माण करणे, हीच नेत्रदानाची खरी ताकद आहे. जागतिक नेत्रदान दिनानिमित्त आपण सर्वांनी एक संकल्प करूया की दृष्टीचा हा अमूल्य वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि अंधत्वमुक्त समाज घडविण्यासाठी नेत्रदानाचा संदेश प्रत्येक घरापर्यंत नेऊया. कारण मृत्यूनंतरही जर आपले डोळे कोणाच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करणार असतील, तर त्यापेक्षा मोठे दान आणि त्यापेक्षा मोठी मानवसेवा दुसरी कोणतीच असू शकत नाही.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

# पावसाळा आला पण उपाय नाहीच; यंदाही विडी घरकूल जलमय होण्याची भीती

## पाणी निचऱ्याची समस्या कायम; गेल्यावर्षीच्या पुराचा अनुभव अजूनही ताजा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :** गेल्यावर्षी मुसळधार पावसामुळे जुने विडी घरकूल परिसरातील शेकडो कुटुंबांना मोठ्या संकटाला सामोरे जावे लागले होते. अनेक घरांमध्ये दोन ते तीन फूट पाणी शिरल्याने संसारोपयोगी वस्तूंचे मोठे नुकसान झाले होते. मात्र, यंदाचा पावसाळा तोंडावर आला असतानाही पाणी निचऱ्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे.

मागील वर्षी ड्रेनेज लाइन तुंबल्यामुळे संभाजी शिंदे प्रशाला परिसर, ईएचजी ग्रुप, प्रियदर्शनी नगर, तुळजाई भोसले नगर, भारतनगर, ब्रह्मानंद नगर, चाकोते नगर आणि मल्लिकार्जुन नगर या भागांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. अनेक घरांमध्ये घाण पाणी शिरल्याने अन्नधान्य, कपडे, फर्निचर तसेच व्यावसायिक आस्थापनांमधील



साहित्याचे नुकसान झाले होते. अनेक कुटुंबांना रात्रभर जागून परिस्थितीचा सामना करावा लागला होता.

### नाल्याचे काम अद्याप अपूर्ण

स्थानिक नागरिकांच्या मते, पावसाळ्यापूर्वी नाल्याचे काम पूर्ण होणे आवश्यक होते. मात्र, कामाच्या संथ गतीमुळे यंदाही पाणी साचण्याचा धोका कायम आहे. नाल्याची खोली, रुंदी आणि पाणी वाहून नेण्याची क्षमता वाढविण्याचे काम अद्याप पूर्णत्वास गेलेले नाही. त्यामुळे मुसळधार पाऊस झाल्यास पुन्हा एकदा परिसर जलमय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

घरकूल परिसरातील काही भागांमध्ये नाल्यांची कामे अद्याप अपूर्ण अवस्थेत असून, पावसाचे पाणी थेट घरांमध्ये शिरण्याची भीती नागरिकांना सतावत आहे.

### प्रशासनाचा दिलासा

याबाबत मनपाचे विभागीय अधिकारी एम. एच. बक्षी यांनी सांगितले की, "पावसाळ्यात दरवर्षी विडी घरकूल परिसरातील घरांमध्ये पाणी शिरण्याच्या पार्श्वभूमीवर यंदा नालेसफाई आणि ड्रेनेज लाइन सफाईची कामे हाती घेण्यात आली आहेत. ही कामे लवकरच पूर्ण करण्यात येतील. तसेच महापालिकेकडून नालेबांधणीचे कामही सुरू असून ते अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना दिलासा मिळेल."

### प्रभावी उपाययोजना कागदावरच?

महापालिका प्रशासनाकडून दरवर्षी मान्सूनपूर्व तयारी आणि नालेसफाईचे दावे केले जात असले तरी प्रत्यक्षात मुख्य नाल्यांचे रुंदीकरण, ड्रेनेज लाइनची क्षमता वाढविणे आणि पर्यायी पाणी निचरा व्यवस्था उभारण्याची कामे अपेक्षित वेगाने होत नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे.

पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना प्रशासनाने तातडीने आणि प्रभावी उपाययोजना केल्या नाहीत, तर विडी घरकूल परिसरातील नागरिकांना पुन्हा एकदा पावसाच्या पाण्यात दिवस काढावे लागतील, अशी भीती व्यक्त होत आहे.

पान १ वरून

# जुनी मिलच्या १३७ एकर जागेतील...

धर्मादाय आयुक्तांच्या परवानगीशिवाय झालेले व्यवहार कायदेशीरदृष्ट्या अवैध ठरू शकतात, असे समितीचे म्हणणे आहे.

ट्रस्टच्या जागेवर मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक वापर, अतिक्रमणे आणि अनधिकृत बांधकामे झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. विविध व्यावसायिक प्रतिष्ठाने, जाहिरात फलक, वाहन व्यवसाय, लॉन्स, कार सर्व्हिस सेंटर, व्यावसायिक संकुले आणि इतर व्यावसायिक उपक्रम या जागांवर सुरू असल्याचे समितीने नमूद केले आहे.

विशेष म्हणजे काही जागा उड्डाणपुलासाठी महानगरपालिकेला हस्तांतरित झालेल्या असल्याचा दावा करण्यात येत असतानाही त्या जागांवर अतिक्रमणे कायम असल्याचा आरोप करण्यात आला आहे. ट्रस्टच्या वतीने संबंधित जागांवरील अतिक्रमणधारकांना जागा रिकामी करण्यासाठी नोटिसा बजावण्यात आल्याची माहिती सचिव डॉ. संदीप आडके यांनी दिली आहे. नोटीस मिळूनही जागा न सोडणाऱ्यांविरोधात ट्रेसपासिंग, अनधिकृत ताबा आणि इतर फौजदारी गुन्ह्यांअंतर्गत पोलिसांकडे तक्रारी दाखल केल्या जाणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला. तसेच नागरिकांनी या जागांबाबत कोणतेही खरेदी-विक्री, गहाण अथवा आर्थिक व्यवहार करू नयेत, असे आवाहनही करण्यात आले आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळापासून आपल्या हक्काच्या जागेच्या प्रतीक्षेत असलेल्या ट्रस्टच्या सुमारे १,१०० सभासदांना आता न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पात्र सभासदांना त्यांच्या हक्काच्या जागांचे वाटप करण्याची प्रक्रिया लवकरच सुरू केली जाईल, असा विश्वास ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, सोलापूरातील सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या १३७ एकर जागेच्या प्रकरणात सहकार विभागाने केलेल्या कारवाईमुळे संबंधित वतुर्ळात मोठी खळबळ उडाली असून पुढील काळात अतिक्रमण, बांधकामे आणि भूखंड व्यवहारांबाबत आणखी मोठ्या कारवाया होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# गोकुळच्या थकीत ऊस बिलासाठी १० जूनला शेतकऱ्यांचे जलसमाधी आंदोलन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** गोकुळ शुगर लि., धोत्री या सहकारी साखर कारखान्याकडील थकीत ऊस बिल तात्काळ मिळावे, या प्रमुख मागणीसाठी शेतकऱ्यांनी आता आंदोलनाची तीव्रता वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. गोकुळ थकीत ऊस बिल शेतकरी व शेतकरी संघर्ष समिती, तुळजापूर आणि अक्कलकोट यांच्या नेतृत्वाखाली १० जून रोजी दुपारी १२.०१ वाजता विजापूर रोडवरील कंबर तलाव येथे जलसमाधी आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती समितीचे नेते अमोल पाटील यांनी दिली. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले असून, गेल्या १६ दिवसांपासून सोलापूर येथील पूनम गेट परिसरात शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन सुरू आहे. मात्र, प्रशासनाकडून कोणतेही ठोस आश्वासन मिळाले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

आंदोलनाच्या पुढील टप्प्यात ४ जून रोजी सहप्रादेशिक साखर विभागाच्या कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी अर्धनग्न आंदोलन करून संताप व्यक्त केला होता. तरीही कारखाना व्यवस्थापनाकडून थकीत ऊस बिलाबाबत कोणतीही सकारात्मक कार्यवाही न झाल्याने शेतकरी आता टोकाची भूमिका घेत असल्याचे दिसून येत आहे.

या जलसमाधी आंदोलनात तुळजापूर व अक्कलकोट परिसरातील सुमारे ५०० शेतकरी सहभागी होणार आहेत. पूनम गेट येथून रंगभवन, सातरस्ता, नवीन जिल्हाधिकारी कार्यालय मार्गे विजापूर रोडवरील कंबर तलावापर्यंत मोर्चा काढण्यात येणार आहे.

या निवेदनावर अरविंद घोडके, अमित पाटील, त्रिलोक पाटील ह्यक्रांतीह्न, रवि कचेरे आणि नामदेव महाबोरे यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

मृग नक्षत्राच्या तोंडावर शेतकऱ्यांनी घेतलेल्या या टोकाच्या निर्णयामुळे प्रशासन आणि साखर उद्योग क्षेत्रात खळबळ उडाली असून, ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा थकीत बिलाचा प्रश्न केव्हा मार्गी लागणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# ग्रामीण भागाला पूर्वीप्रमाणे किमान आठ तास वीज पुरवठा करा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये पंढरपूर तालुक्यातील भीमा नदीकाठच्या शेती पंपांचा वीज पुरवठा पूर्वीप्रमाणे आठ तास करण्यात यावा पाणी व अपुऱ्या विजेमुळे शेतकऱ्यांचे होणारे पिकांचे नुकसान तात्काळ थांबवण्यात यावे या मागणीसाठी संभाजी ब्रिगेड च्या वतीने दोन दिवसात वीज पुरवठा पूर्ववत सुरु करावा अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा ईशारा जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे दिलेला आहे.



पंढरपूर तालुक्यातील भीमा नदीवर असलेल्या गुरसाळे, पंढरपूर, गोपाळपूर, पटवर्धन कुरोली येथील बंधाऱ्यातील पाणी विविध गावच्या पाणी पुरवठा योजनांसाठी राखीव ठेवले आहे. हे पाणी नदी काठच्या शेतकऱ्यांनी पिकांसाठी उचलू नये याकरिता जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने दररोज केवळ २ तास वीजपुरवठा सुरु ठेवला आहे.

याशिवाय विविध मार्गाने जे शेतीपंप चालतील ते जप्त करण्याची कारवाई करण्यात येत आहे. सध्या पंढरपूर तालुक्यातील उन्हाचा कडाका वाढलेला असून पारा ४० अंशाकडे निघालेला आहे. अशा परिस्थिती पायथ्याला पाणी असूनही वीजपुरवठा बंद असल्याने सर्व शेती पंप बंद आहेत. केवळ दोन तासाच्या काळात पिकांना पाणी देणे शक्य नसल्याने शेतातील उभी पिके जाळून जात आहेत जनावरांना सुद्धा पिण्याचे पाण्याची टंचाई निर्माण होत आहे त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी हवालदिल झाला आहे पुरेसे पाणी व वीज उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांच्या वतीने वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी संभाजी ब्रिगेडने जिल्हाधिकाऱ्यांना केलेली आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे मा. पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले पंढरपूर तालुकाध्यक्ष दीपक कवडे पंढरपूर शहराध्यक्ष शनी घुले उत्तर सोलापूर तालुका अध्यक्ष विक्रम वानकर नितीन देशमुख शैलेश चव्हाण विजय भोसले रविकांत माने आधी उपस्थित होते.

# एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री करा

## आमदार बच्चू कडूंच्या वक्तव्याने महायुतीतील नेतृत्व चर्चेत

**अमरावती (कटूसत्य वृत्त):** राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा चर्चांना उधाण आणणारे विधान करत आमदार बच्चू कडू यांनी महायुतीतील नेतृत्वाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे.



देवेंद्र फडणवीस यांना केंद्रात मोठी जबाबदारी देऊन एकनाथ शिंदे यांना पुन्हा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची संधी द्यावी, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली.

अमरावती येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना बच्चू कडू म्हणाले, 'आम्ही शिवसेनेचे कार्यकर्ते आहोत. त्यामुळे आमच्या पक्षाचा मुख्यमंत्री असावा, अशी अपेक्षा प्रत्येक शिवसैनिकाची असणे स्वाभाविक आहे. एकनाथ शिंदे यांनी राज्याचे नेतृत्व केले असून त्यांच्या कार्यपद्धतीबद्दल कार्यकर्त्यांमध्ये आजही मोठा आदर आहे.'

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्व क्षमतेवर कोणताही प्रश्न नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी सांगितले की, 'फडणवीस यांना आणखी मोठी जबाबदारी मिळावी, अशी आमची अपेक्षा आहे. त्यांचे प्रमोशन करून राष्ट्रीय पातळीवर महत्त्वाची भूमिका दिली जाऊ शकते. त्याचवेळी महाराष्ट्राच्या नेतृत्वाची धुरा पुन्हा एकदा एकनाथ शिंदे यांच्या हाती द्यावी, अशी भावना शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये आहे.'

बच्चू कडू यांच्या या वक्तव्यामुळे राज्यातील महायुतीच्या राजकारणात नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे. महायुतीतील नेतृत्वाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर येण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका तसेच इतर राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील नेतृत्व आणि सत्तासमीकरणांबाबत चर्चा अधिक तीव्र होण्याची शक्यता असून बच्चू कडू यांच्या वक्तव्याकडे राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे.

# घरगुती गॅस सिलिंडरच्या दरवाढीचा भडका; गृहिणींचे आर्थिक बजेट कोलमडले!

## प्रती सिलिंडर २९ रुपयांची वाढ महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले

**मानेगाव (कटूसत्य वृत्त):** जागतिक स्तरावरील युद्धजन्य परिस्थितीमुळे कच्च्या तेलाच्या किमतीत झालेल्या वाढीचा परिणाम आता थेट सर्वसामान्यांच्या खिशावर होत असून, शासनाने ७ जून रोजी घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात २९ रुपयांची वाढ केल्याने महागाईचा भडका उडाला आहे. या दरवाढीमुळे विशेषतः गृहिणींचे मासिक आर्थिक बजेट पूर्णपणे कोलमडले असून, कुटुंबाचा खर्च भागविणे अधिक कठीण झाले आहे.



सध्या विविध कंपन्यांच्या घरगुती गॅस सिलिंडरची किंमत ९२० ते ९२६ रुपयांवरून वाढून ९५० ते ९५६ रुपयांपर्यंत पोहोचली आहे. यापूर्वीच पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने वाहतूक खर्च वाढला असून त्याचा परिणाम जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवरही झाला आहे.

खाद्यतेलाच्या दरांनीही उच्चांक गाठला असून एका तेलाच्या डब्यासाठी २५५० ते २६५० रुपये मोजावे लागत आहेत. याशिवाय खोबरे, शेंगदाणे, डाळी आणि इतर किराणा वस्तूंचे दरही मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. घरगुती वीज बिल, मोबाईल रिचार्ज आणि दैनंदिन गरजेच्या सेवांचा खर्चही वाढल्याने सामान्य कुटुंबांवर दुहेरी आर्थिक भार पडत आहे.

सततच्या दरवाढीमुळे सर्वसामान्य जनता, शेतकरी आणि गृहिणी चिंतेत असून, घरखर्च कसा भागवायचा, मुलांचे शिक्षण कसे चालवायचे आणि बँका तसेच वित्तीय संस्थांचे हप्ते कसे भरायचे, असे प्रश्न त्यांच्यासमोर उभे ठाकले आहेत.

एकीकडे शेतीमधून अपेक्षित उत्पन्न मिळत नसताना दुसरीकडे महागाईचा वाढता भस्मासूर सर्वसामान्यांच्या जगण्यावर घाला घालत आहे. युद्धजन्य परिस्थिती कायम राहिल्यास इंधन व घरगुती गॅस सिलिंडरचे दर आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, महागाईचा हा वाढता आलेख कधी थांबणार, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये रंगला चिमुकल्यांचा प्रवेशोत्सव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरातील शैक्षणिक वर्तुळात वेगळा ठसा उमटविलेल्या नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये ९ जून 'विद्यारंभ दिन' मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार (दादा) करजगी, सचिवा सौ. वर्षा विभूते, विश्वस्त यशराज करजगी, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, शाळेच्या मार्गदर्शिका सौ. मीना पारखे, प्राचार्या सौ. रुपाली हजारे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

सर्वप्रथम विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाबपुष्प देऊन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करून कै. नागेश करजगी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. उन्हाळ्याच्या प्रदीर्घ सुट्टीनंतर शाळेची पहिली घंटा वाजली. प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर नवा डबा, नवे दप्तर, वह्या, पुस्तकांची नवलाई असताना आपल्या मित्रमंडळींना भेटण्याची उत्सुकता होती तर दुसरीकडे पूर्व प्राथमिक विभागातील चिमुरड्यांनी पहिल्यांदाच पालकांसमवेत शाळेत पहिले पाऊल टाकले. नव्याची नवलाई असली तरी सारेच काही अनोळखी असल्याने त्यांच्याकडून आई-वडिलांना काही सोडवत नव्हते. शाळेचा परिसर विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने गजबजून गेला होता. शाळेचा पहिला दिवस अविस्मरणीय करण्याच्या दृष्टीने शाळेने जय्यत तयारी केली होती. वर्गातही आकर्षक सजावट करण्यात आली होती.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार (दादा) करजगी यांनी आपल्या भाषणातून उपस्थित विद्यार्थ्यांना व पालकांना मार्गदर्शन केले व शैक्षणिक वर्षाकरिता शुभेच्छाही दिल्या. शाळेच्या प्राचार्या सौ. रुपाली हजारे यांनी सर्व विद्यार्थी व पालकांचे स्वागत केले तसेच शाळेबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका सौ. निकिता येलमेळी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्र. अभि/कावि अर्ज नं. / २०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार सो, यांचे कोर्टात**

श्री. अनुरूद्र शिवाजी शिंदे वय - ४५ वर्षे, धंदा - शेती, रा. पाटील गल्ली, देवगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर } **अर्जदार**

**विरुध्द**

नगरपरिषद मोहोळ, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मुख्याधिकारी नगरपरिषद मोहोळ, मोहोळ, यांचेवर बजावविण्यात यावी.) } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराची मुलगी श्रावणी अनुरुद्र शिंदे हिचा जन्म ता. १२/०८/२०१० रोजी मौजे मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराची मुलगी श्रावणी अनुरुद्र शिंदे हिचे जन्म दाखल्याची ता. १२/०८/२०१० रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे ऑगस्ट २०१० चे अभिलेखात अर्जदाराची मुलगी श्रावणी अनुरुद्र शिंदे हिची जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि. २९/६ / २०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानिशी दिले असे. ता. / /२०२६

**लिपिक** **हुकुमावरुन**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज नं. २०/ २०२६

**मोहोळ येथील मे. सिव्हील जज्ञ ज्युनिअर डिव्हीजन सो, यांचे कोर्टात**

१) श्रीमती मंगल हणुमंत वागज वय - ५४वर्षे, धंदा- घरकाम, रा. शेटफळ, ता. मोहोळ जि. सोलापूर
२) श्री. नितीन हनुमंत वागज वय - ४१वर्षे, धंदा- शेती, रा. शेटफळ, ता. मोहोळ जि. सोलापूर
३) श्री. सचिन हनुमंत वागज वय - ३९वर्षे, धंदा- शेती, रा. शेटफळ, ता. मोहोळ जि. सोलापूर
४) श्री. प्रविण हणमंत वागज वय - ३५वर्षे, धंदा- शेती, रा. शेटफळ, ता. मोहोळ } **अर्जदार**

**विरुध्द**


कोणी नाही } **सामनेवाला**

अर्जदारांने प्रस्तुतचा अर्ज मयताचे वारसप्रमाणपत्र मिळणेकामी या मे. कोर्टात दाखल केलेला आहे. अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडिल म्हणजेच हणमंत ऊर्फ हनुमंत गजेंद्र वागज हे दि. ०६/०३/१९९१ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडिल म्हणजेच हणमंत ऊर्फ हनुमंत गजेंद्र वागज यांचे मृत्युपश्चात कायदेशीर वारस अर्जदार नं. १ ते ४ हेच आहेत. अर्जदार यांच्या व्यतिरिक्त मयतास कायदेशीर दुसरे कोणीही वारस नाहीत. सदर मयत हणमंत ऊर्फ हनुमंत गजेंद्र वागज यांचे पश्चात अर्जदार हे मयताचे वारस असल्याचे प्रमाणपत्र हे कायदेशीर प्रयोजनाकरीता तसेच शासकीय, निमशासकीय, अशासकीय कामकाजाकरीता अर्जदाराच्या नावाच्या नोंदीसाठी व इतर आवश्यक कामकाजासाठी पुरावा म्हणुन अर्जदार हे सदर मयताचे वारस असल्याचे प्रमाणपत्राची मागणी दि. २०/०१/२०२६ रोजीपासुन होत आहे. त्याकरीता या कोर्टात वरील नंबरप्रमाणे अर्ज केलेला आहे. त्याअर्थी सदर अर्जदार हेच मयत हणमंत ऊर्फ हनुमंत गजेंद्र वागज यांचे कायदेशीर वारस असलेबाबत व तसे जाहिर होवुन मिळणेसाठी अर्जदार यांचे नांवे वारस प्रमाणपत्र देणेबाबत कोणाचीही काहीही तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी त्यांची तक्रार व हरकत या न्यायालयात नेमलेली ता.१६/०६/२०२६ रोजी अथवा सदरचे प्रसिध्दीकरण झालेपासुन ०१ महिन्याचे आत दाखल करावी. अन्यथा पुढील योग्य ती चौकशी करुन अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र देणेबाबत योग्य तो आदेश केला जाईल याची नोंद घ्यावी. हे जाहिर प्रसिध्दीकरण दिले असे. ता. / / २०२६

**क. लिपिक** (शिक्का) **सहा. अधिक्षक दिवाणी/फौजदारी न्यायालय मोहोळ**

# सजग नागरिकाच्या सतर्कतेने वृक्षतोड रोखली; कटर टाकून संशयित पसार

## निर्मिती विहार परिसरातील घटना; २५ झाडे तोडण्याची तयारी उघड





**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :** शहरातील १११ झाडांच्या कत्तलीचे प्रकरण ताजे असतानाच सोमवारी पुन्हा एकदा मनपाच्या मालकीच्या खुल्या जागेतील वृक्षतोडीचा प्रकार उघडकीस आला. एका सजग नागरिकाच्या सतर्कतेमुळे ही वृक्षतोड वेळेत रोखण्यात यश आले असून, घटनास्थळी पोहोचलेल्या अधिकाऱ्यांना पाहताच संबंधित व्यक्तींनी वृक्षतोडीचे साहित्य तेथेच टाकून पलायन केल्याची घटना निर्मिती विहार परिसरात घडली.

निर्मिती विहार परिसरातील महानगरपालिकेच्या मालकीच्या खुल्या जागेत काही जण झाडे तोडत असल्याचे एका नागरिकाच्या निदर्शनास आले. त्यांनी तातडीने याबाबत उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांना माहिती दिली. माहिती मिळताच उपमहापौरांनी महानगरपालिका उद्यान विभाग व वृक्ष प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना त्वरित घटनास्थळी पाठविले.

अधिकाऱ्यांचे पथक घटनास्थळी पोहोचण्यापूर्वी एक झाड तोडण्यात आले होते. मात्र, आणखी २५ वृक्ष तोडण्याची तयारी सुरू असल्याचे तपासात समोर आले. अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेताच वृक्षतोड करणारी मंडळी तेथून पळून गेली.

कारवाईदरम्यान वृक्षतोडीसाठी वापरण्यात येणारे कोयते, झाडे तोडण्याची मशीन, पेट्रोल, रासायनिक पदार्थ तसेच अन्य साहित्य जप्त करण्यात आले. याप्रकरणी एका व्यक्तीला ताब्यात घेऊन चौकशी सुरू करण्यात आली आहे.

उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी संबंधितांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले असून, अशा प्रकारांना कोणतीही मुभा दिली जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

"वृक्ष हे शहराचे फुफ्फुस आहेत. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी त्यांचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. बेकायदेशीर वृक्षतोड करणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही. अशा प्रकारांवर कठोर कारवाई केली जाईल," असे उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी सांगितले. शहरातील वाढत्या वृक्षतोडीच्या घटनांमुळे पर्यावरणप्रेमींमध्ये चिंता व्यक्त केली जात असून, या प्रकारामुळे पुन्हा एकदा वृक्षसंवर्धनाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.


## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय

**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**


मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

**उमेश माने**
मो. 9353370779

**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) आमदार या सभागृहासाठी जनतेतून निवडून दिले जातात २) श्वसनेंद्रिय ३) बारीक खडी, चक उलट लिहा ४) राशीचक्रातील एक रास ५) लहान डोंगर ६) एक म्हण-** वसे ते स्वप्नी दिसे ७) एक अभिनेता- *** दामले ८) दारू (हिंदीत) ११) धरणग्रस्त आंदोलनाच्या नेत्या-** पाटकर १३) घर (हिंदीत) १४) स्त्रियांनी कपाळभर लावलेले कुंकू १५) उन्हाळ्यात पिले जाणारे एक दुग्धपेय १७) कोकणातील एक प्रख्यात तालुका १८) महानगरपालिकेवर वॉर्डमधून निवडून जाणारा लोकप्रतिनिधी २२) दहा गुणिले नऊ २४) नशीब (हिंदीत) २५) हात, हस्त, टॅक्स (मराठीत) २७) कष्टाची सवय असणारा २८) फटाक्यांची माळ २९) वाळवलेली खजूर ३१) एक रास ३३) खोडकर (हिंदीत) ३५) दैत्य, राक्षस ३६) याच्यापासून ताक बनवितात ३८) रावणाची बहीण ३९) प्रश्न (हिंदीत) ४०) वेग ४१) स्त्रिया केसात बांधतात ती फुलांची माळ ४२) पक्ष्याचे पंख (हिंदीत) ४३) लोभ, स्वार्थ ४४) बंदूक (इंग्रजीत) ४६) दहा (हिंदीत)

**आडवे शब्द :** १) शिवसंग्राम संघटनेचे संस्थापक
६) भारतातील एक राज्य
९) भीती, दरारा १०) स्पर्धेमध्ये विजेत्या संघास दिला जाणारा कप
१२) मंद प्रकाश (इंग्रजीत) १४) स्वार्थ, हेतू
१६) मनाची तृप्तावस्था, मुलाचे एक नाव
१९) लहान बाळाच्या डोळ्यात घालतात ते २०) कपाळ
२१) श्रीगणेशाचे एक नाव २३) तव उलट लिहा
२६) एक म्हण-हाजीर तो *** २७) खर्चात केलेली बचत
२९) एक म्हण-** तशी माती
३०) कोकण किंवा समुद्रालगतचे हवामान
३२) पतीचा भाऊ ३३) लग्नातील वधू मुलगी ३४) कसयुक्त, सत्व अर्क असलेली
३७) बेळगाव या राज्यात आहे ३८) धाडसी, पराक्रमी
३९) स्वाक्षरी ४०) बोलबाला, बोभाटा
४२) सूर्य उगवण्यापूर्वीचा उष:काल
४४) गणेशोत्सवात आपण याची प्रतिष्ठापना करतो ४५) गतीने, वेगात
४७) वर उलट लिहा ४८) पगार (हिंदीत)

## सुडोकु - 272

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 6 | | 1 | | 9 | | 3 | 8 |
| | 9 | | 3 | 7 | 4 | | 6 | 2 |
| | 3 | | | | | 4 | | |
| | 2 | 7 | | 5 | | 9 | | 3 |
| 9 | | 5 | 4 | | | 6 | | |
| | 8 | | 9 | | 7 | | 5 | |
| 8 | | 1 | 2 | | 6 | | | |
| | | | | | 1 | 7 | 2 | 6 |
| | | | 7 | 4 | | | 9 | |

# वंचित बहुजन आघाडीचा बैलगाडी जनआक्रोश मोर्चा

## महागाई, बेरोजगारी आणि शेतकरी प्रश्नांवर सरकारला धारेवर

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त) :-** वंचित बहुजन आघाडीच्या अक्कलकोट शहर व तालुका शाखेच्या वतीने सोमवारी विविध जनतेच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी बैलगाडी जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. शहरातील प्रमुख मार्गांवरून निघालेल्या या मोर्चात महागाई, बेरोजगारी, शेतकरी प्रश्न आणि विद्यार्थ्यांच्या समस्यांबाबतचे फलक झळकविण्यात आले.

ए-वन चौक, कमलाराजे चौक, फत्तेसिंह चौक, मेन रोड, विजय कामगार चौक आणि एस. टी. स्टँड मार्गे हा मोर्चा काढण्यात आला. मोर्चादरम्यान सरकारच्या धोरणांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.



जिल्हाध्यक्ष चंद्रकांत मडीखांबे यांनी शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नसल्याचा मुद्दा उपस्थित केला. खतांच्या वाढत्या किमती, पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅसच्या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जगणे कठीण झाले असून बेरोजगारीमुळे तरुण वर्ग हवालदिल झाला असल्याचा आरोप त्यांनी केला.

यावेळी नीट परीक्षेतील कथित पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आल्याचा मुद्दाही ठळकपणे मांडण्यात आला. तसेच अनुसूचित जाती-जमातींसाठी असलेला ७३० कोटी रुपयांचा निधी अन्य योजनांकडे वळविल्याचा आरोप करत त्याचा निषेध करण्यात आला.

मोर्चामध्ये वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य डॉ. नितीन ढेपे, डॉ. अनिल जाधव, ॲड. सरोजित बनसोडे, प्रा. सोमनाथ साळुंखे, चंद्रशेखर मडीखांबे, विशाल ठोंबरे, यशवंत इंगळे, बबन गायकवाड, भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष साहिल कांबळे, शिलामणी बनसोडे यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार हा जनआक्रोश मोर्चा आयोजित करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# माळशिरस तालुक्यात गुटखा-मावा विक्री जोमात

## अन्न व औषध प्रशासनाच्या कारवायांच्या परिणामकारकतेवर प्रश्नचिन्ह

**श्रीपूर (कटूसत्य वृत्त) :** माळशिरस तालुक्यात प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीविरोधात अन्न व औषध प्रशासनाकडून वेळोवेळी कारवाया होत असल्या, तरी त्या केवळ जुन्या रेकॉर्डवरील अथवा नेहमीच्या संशयितांपुरत्याच मर्यादित राहत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. परिणामी तालुक्यात गुटखा आणि माव्याची विक्री आजही जोमात सुरू असल्याचा आरोप होत आहे.

तालुक्यातील अनेक गावांमध्ये गुटखा, मावा आणि इतर प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थ सहज उपलब्ध होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विशेषतः शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणांच्या परिसरातही अशा पदार्थांची खुलेआम विक्री होत असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत आहेत.

स्थानिकांच्या मते, कारवाईचे वृत्त आणि छापे यांची माहिती सातत्याने समोर येत असली तरी प्रत्यक्षात गुटख्याचा पुरवठा आणि विक्री पूर्ववत सुरूच आहे. त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या परिणामकारकतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. कारवाया प्रभावी असतील तर प्रतिबंधित माल बाजारात इतक्या सहजपणे उपलब्ध कसा होतो, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

यामागील मोठे पुरवठादार, साठेबाज आणि आर्थिक लाभ



घेणाऱ्या प्रमुख घटकांपर्यंत प्रशासनाची कारवाई पोहोचत नसल्याची भावना अनेक नागरिक व्यक्त करत आहेत. त्यामुळे किरकोळ विक्रेत्यांवरील कारवायांपेक्षा संपूर्ण पुरवठा साखळीवर लक्ष केंद्रित करण्याची गरज व्यक्त होत आहे.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे कर्करोगासह अनेक गंभीर आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे उत्पादन, वाहतूक, साठवणूक आणि वितरण या सर्व स्तरांवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे.

अन्न व औषध प्रशासनाने केवळ दिखाऊ कारवायांवर भर न देता गुटखा विक्रीच्या संपूर्ण साखळीचा शोध घेऊन मोठ्या पुरवठादारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी तालुक्यातील नागरिकांकडून होत आहे.

# संभाव्य पाणीटंचाई रोखण्यासाठी विभागांमध्ये समन्वय आवश्यक

## जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीच्या बैठकीत सूचना

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :** जिल्ह्यात संभाव्य पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी गावपातळीवरील पाणीपुरवठ्याच्या समस्या तातडीने सोडवून सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य यांनी जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीच्या बैठकीत दिले.

जिल्हा परिषदेत सोमवारी आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजित पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर जगताप, जिल्हा जलसंधारण अधिकारी हरीश सपताळे, सहायक जिल्हा जलसंधारण अधिकारी एन. एस. लाड यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, खातेप्रमुख आणि समिती सदस्य उपस्थित होते.

बैठकीत कृषी विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, मृद व जलसंधारण विभाग, भूजल



सर्वेक्षण व विकास यंत्रणा, यांत्रिकी विभाग तसेच लघुपाटबंधारे विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शेततळे योजनांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला, तर भूजल सर्वेक्षण विभागाने तालुकानिहाय भूजल पातळीतील वाढ-घट याबाबत सादरीकरण करून सद्यःस्थितीची माहिती दिली.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या शिरभावी व आंधळगाव पाणीपुरवठा योजनांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. मृद व जलसंधारण विभागाने कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांची स्थिती, साठवण तलाव आणि सुरू असलेल्या सर्वेक्षणाची माहिती सादर केली. तसेच ग्रामीण भागातील बंद पडलेले हातपंप तातडीने दुरुस्त करण्याच्या सूचना यांत्रिकी विभागाला देण्यात आल्या.

जिल्ह्यातील जलस्रोतांचे प्रभावी व्यवस्थापन, पाणीपुरवठा योजनांची कार्यक्षमता वाढविणे आणि संभाव्य टंचाईग्रस्त भागांतील नागरिकांना वेळेवर दिलासा देण्यासाठी प्रशासनाने अधिक सक्रिय व सजगपणे काम करण्याची आवश्यकता असल्याचे मत बैठकीत व्यक्त करण्यात आले. पाणीटंचाईच्या प्रश्नावर दीर्घकालीन नियोजनाबरोबरच तातडीच्या उपाययोजनांवर भर देण्याची गरजही यावेळी अधोरेखित करण्यात आली.

# प्रत्येक गावात मोफत बियाणे केंद्र सुरु करण्याची मागणी

## शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध करून देण्यावर भर; खासदार प्रणिती शिंदे यांचे निवेदन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :** सोलापूर लोकसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना वेळेत, दर्जेदार आणि मोफत बियाणे उपलब्ध व्हावीत यासाठी प्रत्येक गावात मोफत बियाणे वितरण केंद्र अथवा बियाणे दुकान सुरू करण्यात यावे, अशी मागणी खासदार प्रणिती शिंदे यांनी जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील बहुतांश शेतकरी शेतीवर अवलंबून असून अल्पभूधारक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. बियाण्यांच्या वाढत्या किमती, हवामानातील बदल, दुष्काळी परिस्थिती आणि उत्पादन खर्चात सातत्याने होणारी वाढ यामुळे शेतकऱ्यांवर मोठा आर्थिक ताण निर्माण होत असल्याचे खासदार शिंदे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

वेळेत आणि दर्जेदार बियाणे उपलब्ध न झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या उत्पादनावर परिणाम होऊन त्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना गावपातळीवरच मोफत व दर्जेदार बियाण्यांची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

निवेदनात प्रत्येक गावातील केंद्रांमधून प्रमाणित व उच्च दर्जाची बियाणे उपलब्ध करून देणे, खरीप, रब्बी आणि उन्हाळी हंगामासाठी आवश्यक बियाण्यांचा पुरेसा साठा ठेवणे तसेच ग्रामपंचायत, कृषी विभाग आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या सहकार्याने वितरण व्यवस्था राबविण्याची सूचना करण्यात आली आहे.

या उपक्रमामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होण्यास मदत होईल, शेती उत्पादनात वाढ होईल आणि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास खासदार प्रणिती शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

# पहिल्याच दिवशी कोलमडली नाफेडची कांदा खरेदी योजना

## प्रतिनिधींच्या अनुपस्थितीमुळे शेतकऱ्यांचा भ्रमनिरास; बाजार समित्यांमध्ये गोंधळ

**नाशिक (कटूसत्य वृत्त):-** कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने जाहीर केलेली नाफेड आणि एनसीसीएफची बाजार समितीतील कांदा खरेदी योजना पहिल्याच दिवशी कोलमडल्याचे चित्र सोमवारी नाशिक जिल्ह्यात पाहायला मिळाले. बाजार समित्यांमध्ये थेट कांदा खरेदी सुरू करण्याचे आदेश देण्यात आले असतानाही प्रत्यक्ष लिलावाच्या वेळी संबंधित संस्थांचे प्रतिनिधीच गैरहजर राहिल्याने एकाही ठिकाणी अपेक्षित खरेदी होऊ शकली नाही.

सोमवारपासून शासकीय खरेदी सुरू होणार या आशेने शेतकऱ्यांनी पहाटेपासूनच बाजार समित्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कांदा आणला होता. त्यामुळे अनेक बाजार समित्यांमध्ये नियमित दिवसांपेक्षा दुप्पट आवक झाली. मात्र दिवसभर नाफेड आणि एनसीसीएफचे प्रतिनिधी न आल्याने शेतकऱ्यांचा भ्रमनिरास झाला. अखेर अनेकांना आपला माल खासगी व्यापाऱ्यांकडे कमी दरात विकावा लागला.

जिल्ह्यातील निफाड उपबाजार आणि देवळा कृषी उत्पन्न बाजार समितीत दिवसभरात अवघ्या नऊ क्विंटल कांद्याची नाममात्र खरेदी झाली. तर मुख्य केंद्र असलेल्या लासलगावमध्ये खरेदी केंद्र सुरूच होऊ शकले नाही. सटाणा, उमराळे, सिन्नर, चांदवड, मालेगाव, पिंपळगाव आणि येवला बाजार समित्यांमध्ये केवळ कांद्याची प्रतवारी पाहणी करण्यात आली.

नाफेडच्या काही संस्थांकडून तुरळक खरेदी करण्यात आली असली तरी एनसीसीएफ नियुक्त संस्थांनी अनेक ठिकाणी खाते उघडण्याची प्रक्रियाही पूर्ण केली नव्हती. चांदवड तालुक्यात खरेदीसाठी सर्व तयारी पूर्ण झाल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात प्रतिनिधीच अनुपस्थित राहिल्याने प्रशासनाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या संपूर्ण गोंधळामागे विविध यंत्रणांमधील समन्वयाचा अभाव कारणीभूत असल्याचे समोर येत आहे. खरेदी केलेल्या कांद्याची साठवणूक आणि वाहतूक करण्याची जबाबदारी केंद्रीय वखार महामंडळाकडे (सीडब्ल्यूसी) असली तरी आवश्यक साठवणूक क्षमता आणि वाहतूक व्यवस्थेबाबत पुरेशी पूर्वतयारी झालेली नव्हती.

दरम्यान, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी मंगळवारपासून सीडब्ल्यूसीचे अधिकारी बाजार समित्यांमध्ये उपस्थित राहतील आणि खरेदी प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जातील, असे सांगितले आहे. मात्र पहिल्याच दिवशी झालेल्या गोंधळामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

# नागरिकांना डिजिटल सुविधा देण्यासाठी महापालिकेचा ‘ॲप रिलाय’शी करार

## आयटी तज्ज्ञांचे विनामूल्य सहकार्य

## तक्रार निवारण प्रणाली होणार अधिक गतिमान



**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :** महानगरपालिकेच्या विविध डिजिटल प्रकल्पांची वेळेत अंमलबजावणी आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर वाढविण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेने ‘ॲप रिलाय टेक्नॉलॉजी’ कंपनीशी विनामूल्य तांत्रिक सहकार्याचा करार केला आहे. या करारामुळे महापालिकेच्या डिजिटल परिवर्तनाला गती मिळणार असून नागरिकांना अधिक दर्जेदार आणि पारदर्शक सेवा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

महापौर विनायक कोंड्याल यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. महानगरपालिकेच्या विविध तांत्रिक प्रकल्पांची वेळेत पूर्तता करण्यासाठी आणि डिजिटल सेवांचे आधुनिकीकरण करण्यासाठी आयटी क्षेत्रातील तज्ज्ञांशी हा करार करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

सोमवारी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात कंपनीच्या प्रतिनिधींनी त्यांच्या कार्यपद्धतीचे सादरीकरण केले. त्यानंतर करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यावेळी महापौर विनायक कोंड्याल, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, उपायुक्त आशिष लोकरे, उपायुक्त सोनाली यादव, सहायक आयुक्त शशिकांत भोसले, गिरीश पंडित, संगणक प्रोग्रामर नागनाथ पदमगोंडा, सहायक प्रोग्रामर मतीन सय्यद यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

ॲप रिलाय टेक्नॉलॉजीचे संचालक साकेत मोकाटे व प्रसाद कंदलगावकर यांच्यासह गिरीश येलका, ओंकार व्हटकर, उमाकांत कुलकर्णी, नीरज देवस्थळी, प्रथमेश दुधनीकर, रोहन देशमाने आणि अक्षय बाचुवार यांनी महानगरपालिकेच्या डिजिटल परिवर्तनासाठी सहकार्य करण्याची भूमिका स्पष्ट केली.

बैठकीत महापालिकेच्या विद्यमान प्रणालींचे आधुनिकीकरण, जुन्या सॉफ्टवेअर प्रणालींचे नवीन तंत्रज्ञानावर स्थलांतर, ईआरपी, क्लाऊड कॉम्प्युटिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ऑटोमेशन, डेटाबेस सुरक्षा, प्रकल्प नियोजन आणि जोखीम व्यवस्थापन यासंदर्भात सविस्तर चर्चा झाली. तसेच ॲजाईल आणि स्क्रम पद्धतींचा वापर, गुणवत्ता तपासणी, सिस्टिम इंटिग्रेशन, एपीआय सहाय्य आणि कर्मचाऱ्यांसाठी तांत्रिक प्रशिक्षण यावरही भर देण्यात आला.

### सहा कोटी रुपयांची बचत : ओम्बासे

सोलापूर महापालिकेत एआय आधारित अत्याधुनिक प्रणाली कार्यान्वित करण्यात येणार असून तिची सुरुवात तक्रार निवारण व्यवस्थेपासून केली जाणार आहे. ही प्रणाली संबंधित कंपनीकडून विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली असल्याने महापालिकेची मोठी आर्थिक बचत होणार आहे. यापूर्वी एका संस्थेने याच प्रणालीसाठी सुमारे सहा कोटी रुपयांचा खर्च प्रस्तावित केला होता. मात्र, नव्या कंपनीकडून ही सुविधा मोफत मिळाल्याने महापालिकेचा मोठा फायदा झाला असल्याची माहिती आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली. येत्या दीड वर्षात टप्प्याटप्प्याने विविध विभागांमध्ये ही प्रणाली कार्यान्वित केली जाणार असून कामकाज अधिकाधिक पेपरलेस करण्याचा मानस आहे.

### दर्जेदार सेवा मिळणार : कोंड्याल

डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढवून नागरिकांना अधिक दर्जेदार, पारदर्शक आणि जलद सेवा उपलब्ध करून देण्यासाठी हा करार महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले. या सहकार्यामुळे महापालिकेच्या विविध डिजिटल प्रकल्पांना गती मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### तक्रारींचा तत्काळ निपटारा : चाकोते

या उपक्रमामुळे महानगर-पालिकेच्या डिजिटल सेवांची गुणवत्ता वाढण्यास, प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यास आणि कर्मचाऱ्यांचे तांत्रिक कौशल्य विकसित होण्यास मदत होणार आहे. विशेष म्हणजे या सर्व तांत्रिक मार्गदर्शनासाठी कोणताही अतिरिक्त खर्च होणार नसल्याने महापालिकेचा फायदा होईल. तसेच नागरिकांच्या तक्रारींचा तत्काळ निपटारा करण्यासही मदत होणार असल्याचे स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते यांनी सांगितले.

# माजी न्यायमूर्ती गौतम पटेल यांच्या कुटुंबाला धमक्या

## लंडनमध्ये मुलीवर हल्ला

**मुंबई (कटूसत्य वृत्त) :** दाऊदी बोहरा समाजाच्या नेतृत्वावरील वादग्रस्त खटल्यात दिलेल्या निकालानंतर मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती गौतम पटेल आणि त्यांच्या कुटुंबीयांना भारत व ब्रिटनमध्ये गेल्या दहा महिन्यांपासून धमक्या व हिंसाचाराचा सामना करावा लागत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या प्रकरणाची चौकशी ब्रिटनमधील कायदा अंमलबजावणी यंत्रणा आणि दहशतवादविरोधी विभागाकडून सुरू आहे.

दाऊदी बोहरा समाजाचे ५२ वे धर्मगुरू डॉ. सय्यदना मोहम्मद बुरहानुद्दीन यांच्या निधनानंतर समाजाच्या नेतृत्वावरून वाद निर्माण झाला होता. त्यांच्या पुत्र मुफद्दल सैफुद्दीन यांनी ५३ वे दाई म्हणून पदभार स्वीकारला. मात्र, बुरहानुद्दीन यांचे सावत्र बंधू खुजैमा कुतुबुद्दीन यांनी स्वतःला वैध उत्तराधिकारी घोषित करत मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल केला होता.

२०१६ मध्ये कुतुबुद्दीन यांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र ताहेर फखरुद्दीन यांनी खटला पुढे चालविला. तब्बल नऊ वर्षांच्या सुनावणीनंतर एप्रिल २०२४ मध्ये न्यायमूर्ती गौतम पटेल यांनी फखरुद्दीन यांचा दावा फेटाळून लावत मुफद्दल सैफुद्दीन यांच्या नेतृत्वाला मान्यता दिली होती. हा निकाल सध्या मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर प्रलंबित आहे.

### धमक्यांची मालिका

न्यायमूर्ती पटेल यांच्या कुटुंबाला गेल्या दहा महिन्यांत अनेक धमकीची पत्रे प्राप्त झाली आहेत. ऑगस्ट २०२५ मध्ये प्रथम धमकी देण्यात आली होती. मुंबईतील त्यांच्या निवासस्थानी तसेच लंडनमध्ये राहणाऱ्या त्यांच्या मुलीला पाठविण्यात आलेल्या पत्रांमध्ये घरात घुसखोरी केल्याचा दावाही करण्यात आला होता.

अलीकडेच प्राप्त झालेल्या नव्या पत्रात हिंसाचार अधिक वाढविण्याचा इशारा देण्यात आला असून कुटुंबाविरोधात ‘कॉन्ट्रॅक्ट’ देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

### लंडनमध्ये मुलीवर हल्ला

२२ एप्रिल २०२६ रोजी न्यायमूर्ती पटेल यांच्या मुलीवर लंडनमध्ये एका अज्ञात मुखवटाधारी व्यक्तीने हल्ला केला. या हल्ल्यात तिच्या नाकाला गंभीर दुखापत झाली. घटनेनंतर ती रस्त्यावर जखमी अवस्थेत आढळून आली. या प्रकरणाची चौकशी ब्रिटनच्या दहशतवादविरोधी यंत्रणांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, लंडनमधील त्यांच्या मुलीला जर्मनीतील टपाल शिक्क्यासह एक निनावी पत्र पाठविण्यात आले होते. त्यासोबत एक डिजिटल स्टोरेज डिव्हाइसही पाठविण्यात आले. सुरक्षेच्या कारणास्तव कुटुंबीयांनी ते उघडले नसून ते सध्या हर्टफोर्डशायर पोलिसांच्या ताब्यात आहे.

### निकाल मागे घेण्याची मागणी

धमकीच्या पत्रांमध्ये न्यायमूर्ती पटेल यांनी दाऊदी बोहरा नेतृत्व प्रकरणातील आपला निकाल सार्वजनिकरीत्या मागे घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच यासंदर्भात यूट्यूबवर व्हिडिओ प्रसिद्ध करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. न्यायमूर्ती पटेल यांनी या सर्व घटनांची माहिती भारताचे सरन्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती तसेच लंडनमधील भारतीय उच्चायुक्तालयाला दिली आहे. यापूर्वी मुंबईतील गावदेवी पोलीस ठाण्यातही यासंदर्भात तक्रार दाखल करण्यात आली होती.

### पार्श्वभूमी

२३ एप्रिल २०२४ रोजी न्यायमूर्ती गौतम पटेल यांनी दाऊदी बोहरा समाजाचे विद्यमान धर्मगुरू मुफद्दल सैफुद्दीन हेच समाजाचे वैध नेते असल्याचा ऐतिहासिक निकाल दिला होता. न्यायालयाने ताहेर फखरुद्दीन यांचा दावा फेटाळून लावत त्यांना वैध उत्तराधिकारी असल्याचे सिद्ध करता आले नसल्याचे नमूद केले होते.

# विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने राजकीय समीकरणे बदलणार?

## आमदार कल्याणशेट्टी - म्हेत्रे एकाच व्यासपीठावर येणार का?

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त) :** अक्कलकोट तालुक्याच्या राजकारणात एकेकाळी भाजप विरुद्ध काँग्रेस अशी सरळ लढत पाहायला मिळत होती. मात्र बदलत्या राजकीय घडामोडींमुळे तालुक्यातील समीकरणेही बदलली. माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी शिवसेना (शिंदे गट) मध्ये प्रवेश केल्यानंतर भाजप विरुद्ध शिंदेसेना अशी नवी राजकीय रेषा निर्माण झाली. आता मात्र सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने हे दोन्ही राजकीय प्रवाह एकाच दिशेने वाहताना दिसण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

राज्यात महायुतीची सत्ता असून भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) हे सत्तेतील प्रमुख घटक आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अनेक ठिकाणी दोन्ही पक्षांमध्ये





स्पर्धा झाली असली तरी विधान परिषद निवडणुकीत महायुतीच्या उमेदवाराच्या विजयासाठी सर्व घटक पक्षांना एकत्रितपणे काम करावे लागणार आहे.

या निवडणुकीत भाजपने माजी आमदार राजेंद्र राऊत यांना उमेदवारी दिली असून महाविकास आघाडीकडून वसंतराव देशमुख मैदानात आहेत. त्यामुळे महायुतीच्या सर्व नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना एकाच ध्येयासाठी काम करावे लागणार आहे. अक्कलकोटमध्येही आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांचे समर्थक एकाच बाजूने सक्रिय होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

शिवसेना (शिंदे गट) कार्यकर्ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भूमिकेकडे लक्ष ठेवून असले तरी राज्यातील सत्तासमीकरणे लक्षात घेता भाजप उमेदवाराच्या विजयासाठी महायुतीचे सर्व घटक पक्ष एकत्रितपणे प्रयत्न करतील, अशी राजकीय वतुर्ळात चर्चा आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर राजकीय प्रतिस्पर्धी मानले जाणारे आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांना या निवडणुकीत एकाच व्यासपीठावर पाहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या निवडणुकीत अक्कलकोट तालुक्याचे महत्त्व विशेष ठरणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील एकूण ६१६ मतदारांपैकी सुमारे ८० मतदार अक्कलकोट तालुक्यातील आहेत. त्यामुळे तालुक्यातील मतदारांचा कौल निवडणुकीच्या निकालावर प्रभाव टाकणारा ठरू शकतो. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्यांची संख्या आणि त्यांचा राजकीय प्रभाव लक्षात घेता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष अक्कलकोटकडे लागले आहे.

यापूर्वीच्या विधान परिषद निवडणुकीत तत्कालीन आमदार सिद्धाराम म्हेत्रे यांची भूमिका महत्त्वाची ठरल्याची चर्चा होती. त्यांच्या सहकार्यामुळे तत्कालीन भाजप उमेदवार प्रशांत परिचारक यांच्या विजयाचा मार्ग सुकर झाल्याचे राजकीय जाणकार सांगतात. त्यामुळे विधान परिषद निवडणुकांमध्ये अक्कलकोटच्या नेतृत्वाची भूमिका नेहमीच महत्त्वाची राहिली आहे.

दरम्यान, आमदार सचिन कल्याणशेट्टी हे महायुतीतील प्रभावी युवा नेतृत्व म्हणून उदयास आले असून राज्यातील आणि जिल्ह्यातील राजकीय घडामोडींमध्ये त्यांचा प्रभाव वाढताना दिसत आहे. त्यामुळे यंदाच्या विधान परिषद निवडणुकीत त्यांच्या भूमिकेकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. आता या निवडणुकीच्या निमित्ताने अक्कलकोटमधील राजकीय प्रतिस्पर्धी नेते एकाच व्यासपीठावर दिसणार का, याची उत्सुकता राजकीय वतुर्ळात निर्माण झाली आहे.